महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी जि.अहमदनगर

Ph.No.(02426)243374 Email.-comptroller,mpkv@gov.in/ac२mpkv@gmail.com.

---

जा.क्र./म.फु.कृ.वि/नियंत्रक/लेखा-२/१०२७/ २०१९ दिनांक- १५/०२/२०१९

# परिपत्रक

विषय :- **व्यवसायकर नोंदणी व व्यवसायकर विवरण नियमितपणे सादर करणेबाबत.**

संदर्भ :- १) व्यवसायकर अधिकारी , अहमदनगर यांचे दि. १४/०१/२०१९ चे पत्र.

२) मा.आयुक्त, व्यवसायकर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे व्यापारी परिपत्रक जा.क्र. ऐसीएटी/जीएसटी-३/व्यवसायकर/विलंब आकार/२०१८/ब-६६,मुंबई, दि.१४/१/२०१९.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांचे अधिनस्त कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांचे मासिक वेतनामधून शासनाने आदेशीत केलेल्या विहीत दराप्रमाणे व्यवसायकर रक्कम दरमहा कपात करुन, महाराष्ट्र व्यवसायकर कायदा १९७५, कलम ५ अन्वये संबंधीत आहरण व संवितरण अधिका-यांनी त्यांचे नोंदणी क्रमांक आधारे राज्य शासनास पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत भरणे बंधनकारक आहे. यासंदर्भात जर व्यवसायकर रक्कम/विवरण विहीत मुदतीत भरणा केला नसल्यास प्रती दिन रु.२०/- पर्यंत दंड आकारणी करण्याची तरतूद आहे.

या संदर्भात या विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना निर्देशित करण्यात येते की, व्यवसायकरासंबंधी माहिती खालील तक्त्यामध्ये नमूद केलेली माहिती दि. २५/२/२०१९ पर्यंत सादर करावी.

## तक्ता

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिका-याचे नाव व पदनाम | व्यवसायकर नोंदणी क्रमांक | दरमहा १५ तारखेपर्यंत व्यवसायकर भरणा केला जातो किंवा कसे | सन २०१७-१८ या वर्षाचे विवरण (Return) दाखल केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| | | | | |

उपरोक्त संदर्भिय परिपत्रक २ अन्वये, शासनाने **माहे एप्रिल २०१६ ते जानेवारी २०१९** या कालावधीतील ज्या कार्यालयाचे /आहरण व संवितरण अधिकारी यांचे विवरण (Returns) दाखल करावयाचे राहिले असल्यास त्यावर दंडाची रक्कम माफ केली असून संबंधित कार्यालयांनी माहे **फेब्रुवारी २०१९** अखेरपर्यंत विवरण(Returns) दाखल करावेत असे नमूद केले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(कृ.मा.प.)

अ) सद्यःस्थितीमध्ये राज्य शासन अंतर्गत योजनामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनावरील व्यवसायकराची रक्कम एसएयु सेवार्थ प्रणालीद्वारे वेतनाची अदायगी होत असल्यामुळे शासकीय वजावटीमधून कोषागारे स्तरावर (Tresury Level) कपात करण्यात येते.

ब) भा.कृ.अ.प. या योजनांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनावरील व्यवसाय कराची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांचे स्तरावर कपात करुन नेट बँकिंग द्वारे शासनास भरणा केला जातो व त्याचे चलन क्रमांक संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना दिले जाते.

ही पध्दत माहे **फेब्रुवारी देय मार्च २०१९** पासून बंद करण्यात येत असून यापुढे वेतनावरील व्यवसायकर रक्कमेचा धनादेश संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांना देण्यात येईल. संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनी धनादेशासोबत त्यांचे नोंदणी क्रमांकावर चलनाद्वारे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये शासनास भरणा करावा.

नियंत्रक
मफुकृवि,राहुरी

प्रतः- माहितीसाठी सादर

१. संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन, मफुकृवि, राहुरी.
२. अधिष्ठाता (कृषि), तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
३. सहयोगी अधिष्ठाता (पम)/डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय/निकृशि, मफुकृवि, राहुरी/पुणे/धुळे/कोल्हापूर/कराड/नंदुरबार.
४. कुलसचिव/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल, मफुकृवि, राहुरी.
५. प्रकल्प अधिकारी, कृ.म. मुक्ताईनगर/हळगांव.
६. सहयोगी संशोधन संचालक, पुणे/इगतपुरी/कोल्हापूर/सोलापूर
७. प्राचार्य, सर्व कृषि तंत्र विद्यालये.
८. सर्व आहरण व संवितरण अधिकारी /योजनाप्रमुख /कार्यालय प्रमुख, मफुकृवि, राहुरी.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी/ पुणे/धुळे/कोल्हापूर.
१०. अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
११. मा.कुलगुरू महोदय/कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी.